आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -  दुपारी ३.०० वाजता

१२ फेब्रुवारी २०२४ - सोमवार

तरुणांना आपली क्षमता दाखवण्याची समान संधी मिळावी, यासाठी सरकार निश्चित कालावधीत भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज रोजगार मेळाव्याअंतर्गत केंद्र सरकारच्या विविध आस्थापनांमध्ये नव्यानं भरती झालेल्या एक लाखाहून अधिक उमेदवारांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून नियुक्तीपत्रांचं वाटप केलं तेव्हां ते बोलत होते. सरकारनं भरती प्रक्रिया पारदर्शक केली असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या कार्मिक विभागाची नवी वास्तू कर्मयोगी भवनच्या पहिल्या टप्प्याची पायाभरणी यावेळी प्रधानमंत्र्यांनी केली.

देशभरात ४७ ठिकाणी हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपूर जिल्ह्याच्या हिंगणा इथल्या केंद्रीय राखीव पोलीस बल ग्रुप सेंटर मध्ये एकूण ११९ नवनियुक्तांना नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यातं आलं.

**<><><><><>**

माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी पक्ष सदस्यत्वाचा तसंच आमदारकीचा राजीनामा दिला आहे.

पक्षसदस्यत्वाचा  राजीनामा देत असल्याचं पत्र त्यांना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना पाठवलं असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे आमदारकीच्या राजीनाम्याचं पत्र साडे अकराच्या सुमाराला सादर केलं आहे. अध्यक्ष नार्वेकर यांनी चव्हाण यांचा राजीनामा स्वीकारला, असल्याचं त्यांनी ट्विटरवर जाहीर केलं.

दरम्यान काँग्रेसचे अनेक नेते भाजपाच्या संपर्कात असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

अशोक चव्हाण यांचा निर्णय दुर्दैवी असल्याची प्रतिक्रीया विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><><>**

राज्यातल्या शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आशियाई विकास बँकेनं ४ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यात १ हजार २०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. राज्यातल्या आकांक्षित जिल्ह्यांमध्ये अद्ययावत आणि दर्जेदार जिल्हा रुग्णालयं उभारण्यासाठी हा निधी खर्च करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

सुरुवातीला धाराशिव जिल्ह्यात सर्वसुविधायुक्त ५०० खाटांचं अद्यावत जिल्हा रुग्णालय उभारण्याची तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

**<><><><><><>**

नांदेड महापालिका क्षेत्रात विकसित भारत संकल्प यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याचा आज समारोप झाला. तिथल्या लाभार्थी सोनाली सोनकांबळे यांनी सांगितलं…

**होल्ड - बाईट - सोनाली सोनकांबळे**

**<><><><><><>**

बिहारमधे विधानसभा अध्यक्ष अवध बिहारी चौधरी यांच्याविरुद्ध भाजपा आणि जेडीयू सदस्यांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव संमत झाला आहे. नीतिश कुमार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं आज

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत मांडलेल्या  विश्वासदर्शक ठरावावर चर्चा सुरू आहे.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेनं यावर्षीपासून एमओए क्रीडा पुरस्कार देण्याची घोषणा केली. महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेच्या पुण्यात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. सर्वोत्कृष्ट जिल्हा संघटना, राज्य संघटना, सर्वोत्कृष्ट खेळाडू आणि सर्वोत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शकांना हे पुरस्कार दिले जातील. राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचा नावलौकिक उंचावणाऱ्या खेळाडू आणि संघटनांना प्रोत्साहन देण्यासाठी हे पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.  उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, क्रीडा आयुक्त राजेश देशमुख यांच्यासह राज्य ऑलिम्पिक संघटनेचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

दहशतवादविरोधी पथकानं मुंबईत तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून एका महिलेसह सहा बांगलादेशी नागरिकांना अटक केली. हे बांगलादेशी बेकायदेशीर पद्धतीने राहत असल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. शनिवारी वाडीबंदरच्या बीपीटी रोड परिसरात एटीस पथकानं मुंबई पोलिसांसोबत ही संयुक्त कारवाई केली. यात अमीना शेख या ३६ वर्षीय महिलेला अटक केली. तिच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनंतर पोलिसांनी रविवारी अन्य पाच बांगलादेशींना अटक केली. बेरोजगारी आणि उपासमारीमुळे हे बांगलादेशी भारतात आल्याचं तपासातून पुढे आलं आहे.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यात काल संध्याकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. जिल्ह्यात काही ठिकाणी झालेल्या गारपीटीमुळे रबी पिकांचं मोठ नुकसान झालं आहे. दरम्यान, मुदखेड तालुक्यातल्या पिंपळकौठा इथं दुपारी वीज पडल्यानं एका २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला.

गोंदिया जिल्ह्यात काल रात्री जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये अवकाळी पावसाचा फटका बसला. अचानक झालेल्या वादळी पावसामुळे मका पिकाचं मोठं नुकसान झालं. तसंच आंब्याचा मोहोर गळून पडला आहे.

**<><><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार वल्लभ बेनके यांचं काल रात्री पुणे जिल्ह्यात चाकणच्या खासगी रूग्णालयात दीर्घ आजारानं निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारनंतर जुन्नर तालुक्यातल्या हिवरे बुद्रुक इथं अंत्यसंस्कार केले जातील.

**<><><><><><>**

गडचिरोलीत जिल्हाधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानी राज्य राखीव दलाच्या सुरक्षा रक्षकाने आज सकाळी आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**//<><><><><><>//**